दैनिक
# आकर्षण
गणपती बाप्पा मोरया
वर्धापन दिन
संपादक : विजय सांगळे

वर्ष ५ । अंक ३ । बुधवार १६ सप्टेंबर २०२६ । पाने ४ + ४ = ८ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322







## वीजवाहिनीवर काम करताना

# बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्याचा विजेच्या धक्क्याने मृत्यू

दैनिक आकर्षण । केशव कातोरे



**बेलवंडी–** श्रीगोंदा तालुक्यातील विसापूर वीज उपकेंद्रांतर्गत चांभुर्डी येथील ढगेमळा परिसरात नादुरुस्त वीजवाहिनीवर काम करत असताना बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्याचा विजेचा धक्का बसून जागीच मृत्यू झाला. ही घटना आज सकाळी सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास घडली. खुशाल मानसिंग घाडगे (वय ३८) असे मृत कर्मचाऱ्याचे नाव आहे.

घाडगे हे श्री गणेश इंडस्ट्रियल, बारामती यांच्या अंतर्गत बाह्यस्त्रोत कर्मचारी म्हणून विसापूर वीज उपकेंद्रात कार्यरत होते. आज सकाळी ते चांभुर्डी गावातील ढगेमळा परिसरात नादुरुस्त विद्युतवाहिनीच्या दुरुस्तीचे काम करत होते. त्यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित परिसरातील विद्युतपुरवठा बंद करण्यात आला होता. मात्र, काम सुरू असताना त्यांना अचानक विजेचा धक्का बसला आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

विद्युतपुरवठा बंद असतानाही घाडगे यांना विजेचा धक्का कसा बसला, याबाबत प्रश्न उपस्थित होत असून या घटनेची चौकशी होणे आवश्यक आहे. या दुर्घटनेमुळे बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्नही पुन्हा ऐरणीवर आला आहे.

घाडगे यांच्या पश्चात आई, पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या अचानक निधनाने कुटुंबावर मोठे संकट कोसळले आहे. त्यांच्या पार्थिवावर दुपारी तीनच्या सुमारास विसापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर


**महावितरणच्या कामासाठी बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते. अशा कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी नेमकी कोणाची? काम सुरु करण्यापूर्वी विद्युतपुरवठा पूर्णपणे खंडित असल्याची खात्री, आवश्यक सुरक्षा साधने आणि इतर प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जातात का, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. या घटनेची सखोल चौकशी करून दुर्घटनेमागील नेमके कारण स्पष्ट करण्याची मागणी होत आहे.**

### वैद्यकीय व पंचनामा अहवालानंतर भरपाई

**या अपघाती घटनेचा वैद्यकीय अहवाल तसेच पंचनामा अहवाल प्राप्त झाल्यानंतर श्री गणेश इंडस्ट्रियल, बारामती यांच्याकडून नियमानुसार योग्य ती आर्थिक भरपाई देण्यात येईल, अशी माहिती कोळगाव महावितरण केंद्राचे सहायक अभियंता गणेश चौधरी यांनी दिली.**





दातरंगे मळा, एकदंत कॉलनी येथे शिवराज्यकर्ते युवा प्रतिष्ठानतर्फे आकर्षक व मनमोहक गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.


सावेडी येथील श्रमिकनगरमध्ये संघर्ष प्रतिष्ठान ट्रस्टतर्फे बालाजी रूपातील आकर्षक गणेशमूर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.


एकदंत कॉलनी येथील श्री एकदंत गणेश मंडळातर्फे आकर्षक व मनमोहक गणेशमूर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.


**सातभाई गल्ली,अयोध्या अपार्टमेंट येथील प्रसाद नंदकुमार कांबळे यांनी राजस्थानी शैलीतील गुलाबी दगडातील संगमरवरी मंदिर साकारले आहे. शिल्पशैली: स्वामीनारायण मंदिरे (अक्षरधाम), राजस्थानमधील हवेली आणि संगमरवरी मंदिरांमध्ये दिसणारे नक्षीदार खांब, तोरण आणि झुंबरदार घुमट साकारले आहे.गर्भगृह: मध्यभागी भगवान श्रीकृष्णांची बासरी वाजवतानाची श्रीकृष्ण प्रतिमा दाखवली आहे.आकर्षक घरगुती गणपती सजावट केली आहे.**

## दै. आकर्षण निवडक




नगरमधील दिल्लीगेट येथील सातभाई गल्ली मित्र मंडळाने वृंदावनाच्या भगवान श्रीकृष्णचे प्रेम मंदिराचा सुमारे ७० फुटी देखावा बनविला आहे, भव्य असे हे मंदिर दिल्लीगेट वेशीजवळून जाताना नजरेत भरते.

### योगशिक्षक पदविका व एम.ए. योगशास्त्र प्रवेश मुदत ३० सप्टेंबरपर्यंत

**अहिल्यानगर- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या योगशिक्षक पदविका व एम.ए. योगशास्त्र या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची मुदत ३० सप्टेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती योग विद्या धाम, अहिल्यानगरच्या कार्याध्यक्षा सौ. मीना देशपांडे यांनी दिली. योगशिक्षक पदविका अभ्यासक्रमासाठी १८ वर्षांवरील व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे. तसेच एम.ए. योगशास्त्र या अभ्यासक्रमासाठी कोणत्याही शाखेतील पदवीधरांना प्रवेश घेता येणार आहे. योगशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही संधी उपलब्ध झाली असून, जास्तीत जास्त योगप्रेमींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य श्री. माणिक अडाणे व डॉ. विश्वनाथ काळे यांनी केले आहे. व प्रवेशासाठी योग विद्या धाम, योग भवन, ज्ञानेश्वर मोटार ड्रायव्हिंग स्कूलमागे, कुष्ठधाम रोड, सावेडी, अहिल्यानगर येथे संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी ०२४१-२४२१२५५ या क्रमांकावर सकाळी १० ते दुपारी १ व सायंकाळी ४ ते ७ या वेळेत संपर्क साधता येईल. तसेच मोबाईल क्रमांक ९४२३६७६०५९ वर संपर्क साधावा.**

### भाऊसाहेब लोळगे यांचे निधन

**अहिल्यानगर - केडगाव येथील रहिवासी भाऊसाहेब लोळगे (वय ६४) यांचे मंगळवार, दिनांक १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७:००**



**अल्पशा हृदयविकाराने दुःखद निधन झाले. बुधवारी केडगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. ते अत्यंत हसमुख मनमिळावू स्वभावाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी व एक मुलगा असा परिवार आहे.**

# श्री.नाथ विद्या मंदिरमध्ये पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या श्री. नाथ विद्या मंदिर मध्ये शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. शनिवारी सकाळी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यशाळेत विद्यार्थ्यांना शाडू मातीचे महत्त्व, पर्यावरणपूरक गणेशमूर्तीची आवश्यकता तसेच गणेशोत्सव साजरा करताना पर्यावरणाचे संरक्षण कसे करता येईल, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वतः च्या हाताने शाडू मातीपासून गणेशमूर्ती साकारण्याचा आनंद घेतला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, निसर्गप्रेम आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचा संदेश दिला. मुख्याध्यापिका सौ.साईगीता सब्बन यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. यावेळी त्यांनी विद्यार्थी, पालक तसेच नागरिकांनी सुद्धा शाडू मातीच्या गणपतीची प्रतिष्ठापना करावी.असे आवाहन केले.

कार्यशाळेस श्री.बालाजी वल्लाळ यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमास अहिल्यानगर महानगर पालिकेचे पर्यावरण संरक्षणाचे कार्य करणारे श्री.ऋषीकेश लांडगे,श्री. गौतम गराडे, सौ.स्वाती कडनोर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.व्हि.बी. कबाडी यांनी केले. शाळेतील शिक्षक, विद्यार्थी व उपस्थित मान्यवरांनी उपक्रमाचे कौतुक केले.

# आकाश भाऊसाहेब टकले यांचा राज्यात बारावा क्रमांक; बाळूमामा सेवाधाम समितीच्या वतीने सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** मनात ध्येय असेल, मेहनतीची तयारी असेल आणि परिस्थितीशी दोन हात करण्याची जिद्द असेल, तर यशाला गवसणी घालण्यापासून कोणतीही ताकद रोखू शकत नाही, याचा प्रत्यय आकाश भाऊसाहेब टकले यांनी आपल्या कर्तृत्वातून करून दिला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत () घेण्यात आलेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या परीक्षेत राज्यात तब्बल बारावा क्रमांक पटकावत त्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांच्या या अभिमानास्पद कामगिरीने कुटुंबीयांसह माळेगाव परिसराच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.



आकाश टकले यांनी मिळवलेले हे यश केवळ एका परीक्षेतील क्रमांक नसून, अथक परिश्रम, सातत्य, आत्मविश्वास आणि ध्येयासाठी घेतलेल्या कठोर मेहनतीचे फलित आहे. यशाच्या या शिखरापर्यंत पोहोचताना त्यांनी अनेक अडचणींवर मात केली. त्यामुळे त्यांच्या यशामध्ये केवळ गुणवत्ता नाही, तर स्वप्नांना सत्यात उतरविण्याची प्रचंड जिद्द आणि चिकाटी दडलेली आहे.

आकाश भाऊसाहेब टकले यांच्या या दैदिप्यमान यशाबद्दल माळेगाव येथील बाळूमामा सेवाधाम समितीचे संचालक रामदास भिसे यांनी पुढाकार घेतला. बाळूमामा सेवाधाम समितीच्या वतीने आकाश टकले यांचा पारंपरिक फेटा बांधून, पुष्पगुच्छ व सन्मान करून गौरव करण्यात आला. यावेळी त्यांच्या यशाचे कौतुक करताना त्यांच्या पुढील प्रशासकीय वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. राज्यात बारावा क्रमांक मिळवून आकाश टकले यांनी आपल्या कर्तृत्वाची वेगळी ओळख निर्माण केली असून, त्यांच्या या यशाने परिसरातील तरुणाईला नवी उमेद आणि प्रेरणा मिळाली आहे.

''ध्येय मोठे असेल तर मेहनतही मोठीच असते आणि मेहनतीसमोर यशाला झुकावेच लागते,'' हे आकाश टकले यांनी सिद्ध करून दाखविले आहे.

# डॉ.विखे पाटील अभियांत्रिकीचा धनराज विटेकरला जर्मनीत नोकरी ४० लाखाचे वार्षिक पॅकेज

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या धनराज विटेकरला जर्मनीत नोकरीसाठी निवड झाली तब्बल ४० लाखांचे वार्षिक पॅकेज मिळाले असून डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या दृष्टीने अभिमानास्पद बाब आहे. स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचा विद्यार्थी धनराज विटेकर याने आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. धनराजची जपानमधील टोकियो येथील - कंपनीत सिव्हिल इंजिनिअर म्हणून तब्बल ४० लाख वार्षिक पॅकेजवर नियुक्ती झाली आहे.



अहिल्यानगरसारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्याने आपल्या गुणवत्ता, जिद्द, तांत्रिक कौशल्य आणि सातत्यपूर्ण परिश्रमाच्या जोरावर थेट जपानमध्ये मिळविलेली ही संधी विशेष उल्लेखनीय ठरली आहे. या यशामुळे अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी जागतिक स्तरावरील करिअरच्या नव्या संधी अधोरेखित झाल्या आहेत.

अहिल्यानगरसाठी अभिमानाचा क्षण असल्याची प्रतिक्रिया फाउंडेशनचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी धनराजचे अभिनंदन करताना दिली.

धनराजचे यश हे केवळ महाविद्यालय आणि फाउंडेशन साठीच नव्हे, तर संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे. ग्रामीण आणि निमशहरी भागातील विद्यार्थ्यांमध्ये जागतिक स्तरावर यशस्वी होण्याची प्रचंड क्षमता आहे. योग्य शिक्षण, कौशल्य, मेहनत आणि संधी मिळाल्यास आपले विद्यार्थी जगाच्या कोणत्याही व्यासपीठावर स्वतःची ओळख निर्माण करू शकतात. धनराजचे हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल. असे फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खा. डॉ.सुजय विखे पाटील यांनी अभिनंदन करताना धनराज चे कौतुक केले.

विद्यार्थ्यांना केवळ पदवी प्रदान करणे नव्हे, तर त्यांना जागतिक उद्योगविश्वाच्या अपेक्षांनुसार ज्ञान, कौशल्य आणि आत्मविश्वासाने सक्षम करणे हे आमचे ध्येय आहे. धनराजला मिळालेले ४० लाखांचे आंतरराष्ट्रीय पॅकेज ही या दिशेने होत असलेल्या प्रयत्नांची पावती आहे. त्याच्या यशामुळे ग्रामीण महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय करिअरची मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा मिळेल.असे गौरवद्गार

फाउंडेशनचे संचालक (तांत्रिक) प्रा.सुनील कल्हापुरे यांनी काढले. विद्यार्थ्यांनी केवळ राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय रोजगाराच्या संधींसाठी सक्षम व्हावे, या उद्देशाने संस्थेचे प्रयत्न सुरू आहेत.

# अहिल्यानगरमध्ये ११ दिवसांची गरबा-दांडिया कार्यशाळा

## २७ सप्टेंबरला मोफत प्रात्यक्षिक कार्यशाळेने प्रारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नवरात्रोत्सवाची चाहूल लागताच शहरासह परिसरात गरबा आणि दांडियाचा उत्साह निर्माण झाला आहे. याच पार्श्वभूमीवर गेल्या १५ वर्षांपासून हजारो विद्यार्थ्यांना गरबा-दांडियाचे प्रशिक्षण देणाऱ्या अपॉस्ट्रॉफी नृत्य अकादमीतर्फे यंदाही भव्य गरबा व दांडिया प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेची सुरुवात २७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत होणाऱ्या मोफत प्रात्यक्षिक कार्यशाळेने होणार आहे. इच्छुकांना कोणतेही शुल्क न भरता प्रत्यक्ष प्रशिक्षणाचा अनुभव घेण्याची संधी यावेळी मिळणार आहे. त्यानंतर २८ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर या कालावधीत ११ दिवसांची विशेष गरबा-दांडिया प्रशिक्षण कार्यशाळा होणार आहे.

ही कार्यशाळा बंधन लॉन्स, नगर-मनमाड रस्ता, अहिल्यानगर येथे होणार असून महिला, युवती, मुले, युवक तसेच गरबा शिकण्याची आवड असलेल्या सर्वांसाठी ती खुली आहे.

विशेष म्हणजे, या कार्यशाळेत केवळ गरब्याच्या नृत्याच्या हालचाली शिकविण्यापुरते प्रशिक्षण मर्यादित राहणार नसून गुजरातच्या पारंपरिक आणि अस्सल गरबा संस्कृतीचा अनुभव सहभागींना देण्यात येणार आहे. ताली गरब्याचे विविध प्रकार, सनेडो, चकडी, पोपटीया, घूमर, धोदिया, काठियावाडी शैली, दांडिया रास यांसह नवरात्रोत्सवात सादर करता येणारे विविध आकर्षक प्रकार शिकविले जाणार आहेत.

गेल्या अनेक वर्षांत अपॉस्ट्रॉफी नृत्य अकादमीच्या माध्यमातून प्रशिक्षण घेतलेल्या शेकडो महिला व युवतींनी विविध गरबा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि नवरात्रोत्सवांमध्ये उत्कृष्ट सादरीकरण करून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. यंदाही गरबा ही कला अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासह सर्वांना माफक शुल्कात दर्जेदार प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याचा अकादमीचा प्रयत्न आहे.

२७ सप्टेंबरपूर्वी नोंदणी करणाऱ्यांसाठी प्रशिक्षण शुल्क ४०० रुपये ठेवण्यात आले असून, त्यानंतर शुल्क ५०० रुपये राहणार आहे. गट नोंदणीसाठी विशेष सवलतीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# आईच्या पुण्यस्मरणार्थ ५०१ वडाच्या रोपांचे वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** वडुले बु. (ता. शेवगाव) येथील कै. चंद्रभागाबाई विनायक डमाळ यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त डमाळ व भासार परिवाराच्या वतीने पर्यावरण संवर्धनाचा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. आईच्या पुण्यस्मरणाची आठवण कायमस्वरूपी जपण्याबरोबरच समाजाला पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत परिवाराने तब्बल ५०१ वडाच्या झाडांचे वाटप करून चंद्रभागाबाई डमाळ यांना अनोखी आदरांजली वाहिली.

भास्कर डमाळ, बाबासाहेब डमाळ, शिवाजी डमाळ, सिंधूताई भासार, प्रशांत अशोकराव भासार, प्रमोद भासार व परिवारातील सदस्यांनी हा पर्यावरणपूरक उपक्रम आयोजित केला. या उपक्रमातून आईच्या स्मृतीला केवळ श्रद्धांजली न वाहता तिच्या नावाने समाज व पर्यावरणासाठी उपयुक्त कार्य करण्याचा संदेश देण्यात आला. यावेळी जय हिंद फाउंडेशनचे शिवाजी पालवे यांनी डमाळ व भासार परिवाराच्या या उपक्रमाचे कौतुक केले. ते म्हणाले,



''आईच्या पुण्यस्मरणानिमित्त राष्ट्रीय वृक्ष असलेल्या वडाची झाडे वाटप करणे हा अत्यंत कौतुकास्पद उपक्रम आहे. मनुष्याच्या जीवनातील सुख-दुःखाच्या प्रत्येक प्रसंगी झाडे लावण्याची आणि त्यांचे संवर्धन करण्याची गरज आहे.''

सध्या पर्यावरणाचे संतुलन मोठ्या प्रमाणात बिघडत असून पावसाचे प्रमाण कमी होत चालले आहे. वाढते तापमान, बदलते हवामान आणि पर्यावरणाचा ऱ्हास याचा परिणाम सर्वांनाच भोगावा लागत आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या आयुष्यात झाडे लावण्याबरोबरच त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. ''आज आपण झाडे लावली नाहीत, तर भविष्यात त्याची मोठी किंमत आपल्याला मोजावी लागेल,'' असेही शिवाजी पालवे यांनी सांगितले.


डमाळ व भासार परिवाराने आईच्या नावाने जय हिंद फाउंडेशन, अहिल्यानगर यांना ५०० वडाची रोपे दिली आहेत. या रोपांची योग्य ठिकाणी शास्त्रोक्त पद्धतीने लागवड करून त्यांचे नियमित संवर्धन करण्यात येणार असल्याचे शिवाजी पालवे यांनी स्पष्ट केले. वडाचे झाड पर्यावरणीयदृष्ट्या महत्त्वाचे असून त्याच्या माध्यमातून जैवविविधतेला तसेच पर्यावरणीय संतुलनाला हातभार लागतो. त्यामुळे मातृस्मरणातून करण्यात आलेला हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### निमगाव वाघात पर्यावरणपुरक श्री गणेशाची स्थापना



**अहिल्यानगर - निमगाव वाघा (ता. नगर) येथे पर्यावरणपुरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने स्व.पै.किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने शाडूच्या मातीच्या गणेश मुर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.डोंगरे वस्ती येथे ग्रामपंचायत सदस्य तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. यावेळी सचिव मंदाताई डोंगरे, युवा मंडळाचे अध्यक्ष पै.संदिप डोंगरे, अजिंक्य वाबळे, कृष्णा डोंगरे, कार्तिक डोंगरे, शिवा डोंगरे, दादा डोंगरे, किरण ठाणगे आदी उपस्थित होते. गणेश उत्सवानिमित्त निमगाव वाघात संस्थेच्या वतीने विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. व्यसनमुक्ती व पर्यावरणाच्या जागृतीसाठी उपक्रम राबविण्यात येणार आहे. तर जनजागृतीसाठी पथनाट्याचे आयोजन करुन मतदार जागृती, स्त्री जन्माचे स्वागत, स्त्री सक्षमीकरण, व्यसनमुक्तीचा संदेश दिला जाणार आहे. युवकांसाठी स्वच्छता अभियान व वृक्षरोपण अभियान देखील राबविण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी दिली.**

### ऊस गाळप हंगाम पूर्व बैठक तातडीने घ्या; अभिजीत पोटे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



**अहिल्यानगर - सन २०२६-२७ च्या ऊस गाळप हंगामाच्या पार्श्वभूमीवर मागील हंगामातील त्रुटी, ऊस दरातील अनियमितता आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली ऊस गाळप हंगाम पूर्व बैठक तातडीने घेण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेचे शिवसैनिक तथा ऊस उत्पादक शेतकरी प्रतिनिधी अभिजीत अशोकराव पोटे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले यावेळी संजय वाघ आदी उपस्थित होते.**
**तसेच त्यावर जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी पुढील आठवड्यात बैठक घेण्याचे आश्वासन दिले. सन २०२३ च्या ऊस गाळप हंगामात श्रीगोंदा येथील कुंडलिकराव जगताप सहकारी साखर कारखान्याने जास्तीचा ऊस दर सांगून शेतकऱ्यांचा ऊस तोडून नेला. त्यानंतर जप्तीची कारवाई निघाल्यावर केवळ एफआरपीप्रमाणे पैसे देण्यात आल्याने शेतकऱ्यांना प्रतिटन ७११ रुपयांचा तोटा सहन करावा लागल्याचा आरोप अभिजीत पोटे यांनी केला आहे. या प्रकरणी संबंधित कारखान्याचे चेअरमन व कार्यकारी संचालक यांना हंगाम पूर्व बैठकीस बोलावून योग्य ती चर्चा करून निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.**



अंतिम चोक मित्र मंडळाने (नालेगाव अमरधाम समोर ) आकर्षक गणेश मूर्तीची स्थापना केली.



गणराया मित्र मंडळाने (जुनी वसंत टॉकीज रोड ) याणी आकर्षक गणेश मूर्ती स्थापन केली (सर्व छाया- राजू खरपुडे ,नगर)



कोठीची तालीम येथील नवयुग मित्र मंडळाने शंकराच्या रूपातील गणेश मूर्तीची स्थापना केली.



ढोरगल्लीचा राजा मित्र मंडळाने वाघावर विराजमान गणेश मूर्ती स्थापना केली

### मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधून

# बीड-नगर-पुणे रेल्वेसेवा गुरुवारपासून होणार सुरू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधून गुरुवार दिनांक १७ सप्टेंबरपासून बहुप्रतीक्षित बीड-पुणे रेल्वे सेवा सुरू होत आहे. बीडहून निघणारी ही रेल्वे अंमळनेर, न्यू आष्टी, नारायणडोह मार्गे अहिल्यानगरला पोहोचेल आणि तिथून दौंड, श्रीगोंदा रोड व उरुळी कांचन मार्गे पुण्याला रवाना होईल.

अहिल्यानगरहून रोज हजारो नागरिक पुण्याला जातात. या नियमित थेट रेल्वे सेवेमुळे नगरकरांना पुण्याला जाण्या-येण्यासाठी आणखी एक चांगला पर्याय तयार झाला आहे. रात्रीच्या वेळेत प्रवास करून सकाळी पुण्यात पोहोचता येणार असल्याने विद्यार्थी व व्यावसायिकांसाठी ही रेल्वेसेवा विशेष फायदेशीर ठरणार आहे.

पुणे-बीड (गाडी क्रमांक ११४३३) आणि बीड-पुणे (गाडी क्रमांक ११४३४) अशा दोन्ही दिशांनी ही सेवा सुरू झाली आहे. या प्रवासादरम्यान उरुळी कांचन, दौंड, श्रीगोंदा रोड, अहिल्यानगर, नारायण डोह, न्यू आष्टी आणि अंमळनेर भांड्याचे या स्थानकांवर गाडीला थांबा देण्यात आला आहे.

## कर्जत येथील सराफी दुकान फोडणारे तीन आरोपी जेरबंद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** कर्जत येथील ओम ज्वेलर्स फोडून चांदीचे दागिने लंपास करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत चोरीचा माल खरेदी करणाऱ्यासह तीन जणांना अटक करण्यात आली असून, मिरजगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आणखी एक गुन्हा उघडकीस आला आहे.
दिनांक ८ सप्टेंबर रोजी कर्जतमधील सोनार गल्लीतील उमेश कुलथे यांचे दुकान फोडल्याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी तपास पथक तयार केले. गोपनीय बातमीदार



आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पथकाने १५ सप्टेंबर रोजी जामखेड-अहिल्यानगर रस्त्यावरील टाकळी फाटा येथे सापळा रचून भगतसिंग सुरेशसिंग बावरे (वय २५, रा. अमळनेर, जि. बीड) व लखनसिंग शेरसिंग टाक (वय २४, रा. वडवणी, जि. बीड) यांना ताब्यात घेतले.
सखोल चौकशीत आरोपींनी गोविंदसिंग बावरे, सनीसिंग गोवे आणि अजयसिंग बावरे यांच्या मदतीने चोरी केल्याची कबुली दिली. तसेच चोरीचा मुद्देमाल खरेदी करणारा दत्तात्रय मुरलीधर म्हस्के (वय ३८, रा. बाहेगव्हाण, जि. बीड) यालाही पोलिसांनी अटक केली आहे.
तपासादरम्यान आरोपींनी १० सप्टेंबर रोजी मिरजगाव येथील सराफी दुकान फोडण्याचा प्रयत्न केला होता. नागरिक जमा झाल्याने पळ काढताना त्यांनी तिखी शिवारातून चोरलेली मोटारसायकल (-१६--४६४२) देखील निष्पन्न झाली असून मिरजगाव पोलीस ठाण्यातील गुन्हा उघडकीस आला आहे.
ही कारवाई सपोनि हरीश भोये आणि अंमलदार सोमनाथ झांबरे, शामसुंदर जाधव, किशोर शिरसाठ यांच्या पथकाने केली.

## अहिल्यानगरमध्ये २७ सप्टेंबरला 'वैशाली सरडे स्मृती' लघुनाटिका (स्किट) स्पर्धेचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** होशी प्रायोगिक कलावंत संघ, अहिल्यानगर शाखेच्या वतीने 'वैशाली सरडे स्मृती लघुनाटिका (स्किट) स्पर्धा २०२६' चे आयोजन रविवार, २७ सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात आले आहे. ही स्पर्धा जिल्हा वाचनालय सभागृह, सावेडी शाखा, एलआयसी कॉलनी, गंगा उद्यानाजवळ, जॉगिंग ट्रॅक शेजारी, सावेडी, अहिल्यानगर येथे होणार आहे.
स्पर्धा सर्व वयोगटातील स्पर्धकांसाठी खुली असून प्रत्येक संघात किमान २ आणि कमाल ४ कलाकार असणे आवश्यक आहे. स्किटचे सादरीकरण मराठी भाषेत करावे लागणार असून प्रत्येक संघाला किमान १० व कमाल १५ मिनिटांचा वेळ दिला जाणार आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार असून प्रथम क्रमांकासाठी ५,००० रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ३,००० रुपये, तृतीय क्रमांकासाठी २,००० रुपये आणि दोन उत्तेजनार्थ बक्षिसे प्रत्येकी १,००० रुपये देण्यात येतील. तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

स्पर्धेची प्रवेश फी २०० रुपये असून पहिल्या २० अर्जांना प्राधान्य दिले जाणार आहे. स्पर्धे साठी आवश्यक नेपथ्य, वेशभूषा व प्रॉप्स स्पर्धकांनी स्वतः आणावेत. अश्लील, असभ्य, जातीय किंवा धार्मिक तेढ निर्माण करणारे अथवा कोणत्याही व्यक्ती, समाज किंवा समुदायाचा अपमान करणारे सादरीकरण स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी अविनाश कराळे ९८२३२९७५२९, रियाज पठाण ९९२२४१९१६८, संदीप येळवंडे ९०४९८२९७७१ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# नगरचे अष्टविनायक माहीती















**शमी गणपती**
दिल्ली दरवाजाजवळील शमी गणपती मंदिरात दशनासाठी भाविकांची नेहमी गदी असते शमींच्या झाडाखालील मुळीपासून ही मूती तयार झाल्याची आख्यायिका आहे नवसाला पावणारा म्हणून शमी गणपतीची ख्याती आहे

**वाळके वाडयातील गणपती**
टांगेगल्ली येथील वाळके वाडयातील हा गणपती नगरच्या अष्टविनायकांपैकी एकमेव डाव्या सोंडेचा आहे साडेपाच फूट उंचीचा हा गणपती भाविकांचे श्रध्दास्थान आहे वाळके कुटुंबाने मूती अलंकाराने मढविल्याने मोहक दिसते वाळके कुटुंब दरवषी एकत्र येउन मंदिरात गणेशोत्सव साजरा करतात

**मुळे वाडयातील गणपती**
दिल्ली दरवाजाजवळील देशमुख गल्लीतील मुळे वाडयात ही स्वंयभू गणेश मूती आहे उजव्या सोंडेचा हा गणपती नवसाला पावणारा आहे अशी शहरातील भाविकांची श्रध्दा आहे

**मिरीकर वाडयातील गणपती**
जुन्या कोटासमोरील सरदार मिरीकर वाडयातील गणपती पुरातन आहे उजव्या सोंडेचा हा गणपती वाडयातील एका कोपऱ्यात आहे ज्येष्ठ पत्रकार श्रीपाद मिरीकर व त्यांचे कुटुबीय या गणपतीची पूजा करतात

**खाकीदासबाबा मठातील गणपती**
खाकीदासबाबा मठातील गणपतीची मूती तीनशे वषापूवीची आहे उजव्या सोंडेचा हा गणपती चारही हातांनी आशीवाद देणारा आहे कोणत्याही हातात शस्त्र नसणारी ही मूती आहे टस्टच्या वतीने यांची देखभाल केली जाते.

**वाडेकर वाडयातील गणपती**
अर्बन बॅंक रस्त्यावरील जुन्या वाडेकर वाडयात उजव्या सोंडेची ही मूती अडीचशे वषापूवीची आहे संगमरवरी मूतीचे जानवे नागाचे आहे नित्यदशनाने मनोकामना पूण होते अशी असंख्य भाविकांची श्रध्दा आहे.

**गुजर गल्लीतील अक्षता गणपती**
येथील गुजर गल्लीतील अक्षता गणपती हा नगरमधील अष्टविनायक गणपतीपैकी आहे विवेकांनद चौक ते कोट रस्त्यावर गणपतीचे मंदिर आहे.पूर्वीच्या काळात सदर जागेवर विहिर होती विहिरीत देवपूजा झाल्यानंतर सदरचे पाणी विहिरीत टाकले जात विहिरीतील तांदळापासून अक्षता गणपती तयार झाला आहे सदर मूर्ती उंची ५ फूट असून माडी घातलेली आहे डोक्यावर मुकुट,दोन डोळे तसेच १ दात व उजव्या बाजूस सोंड अशी मूर्ती पहावयास मिळते कोणतेही शुभ कार्याचा निमंत्रण प्रथम या गणपतीस देण्यात येते.

**संकलन व छायाचित्र उदय जोशी**
**९४२३१६३९०३**

# खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यातील मुख्य आरोपी विकी राक्षे गजाआड

## एलसीबीची कारवाई, इतर सात साथीदार निष्पन्न




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** लोणी (ता. राहाता) येथे नागेश लोट यांच्यावर जीवघेणा हल्ला करणाऱ्या मुख्य संशयित आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिताफीने जेरबंद केले. गणेश उर्फ विकी आण्णासाहेब राक्षे (वय २८, रा. वेताळबाबा चौक, लोणी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या गुन्ह्यातील त्याचे इतर सात साथीदारही निष्पन्न झाले आहेत.

दिनांक ५ सप्टेंबर रोजी रात्री सव्वा आठच्या सुमारास नागेश शंकर लोट (वय ३८, रा. लोणी) हे मोटारसायकलवरून घरी जात होते. त्यावेळी ब्राम्हणे वस्तीजवळ दोन दुचाकींवरून आलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी त्यांना अडवून तलवार, चाकू आणि लोखंडी रॉडने नागेश यांच्या डोक्यावर व पाठीवर सपासप वार करून त्यांना गंभीर जखमी केले होते. याप्रकरणी लोणी पोलीस ठाण्यात बीएनएस कायद्याच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी गुन्ह्याचा समांतर तपास करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक तयार करण्यात आले.

गोपनीय बातमीदार आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास सुरू असताना, मुख्य आरोपी विकी राक्षे हा लोणी येथील जनावरांच्या बाजारात पांढऱ्या रंगाच्या क्रेटा कारमध्ये थांबल्याची खात्रीशीर माहिती पथकाला मिळाली. पोलिसांनी तत्काळ सापळा रचून विकी राक्षे याला ताब्यात घेतले.

पोलिसी खाक्या दाखवताच आरोपीने इतर सात साथीदारांच्या मदतीने हा हल्ला केल्याची कबुली दिली. आरोपीला पुढील तपासासाठी लोणी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

# जन शिक्षण संस्थेत क्षमता बांधणी कार्यक्रम उत्साहात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** महिला व युवतींना विविध व्यावसायिक कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने भारत सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय (नवी दिल्ली) संचलित जन शिक्षण संस्थेच्या वतीने क्षमता बांधणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील जन शिक्षण संस्थेत झालेल्या या कार्यक्रमात महिला प्रशिक्षिका व शिक्षिकांना विविध व्यावसायिक प्रशिक्षणाबरोबरच मार्केटिंग, बाजारपेठेची उपलब्धता, उद्योग-व्यवसायासाठी आवश्यक असलेले बीज भांडवल, शासकीय योजना, कर्ज प्रक्रिया आणि उद्योजकता विकास याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्रशिक्षाणार्थी युवती व महिला देखील मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी जन शिक्षण संस्थेचे नूतन संचालक अनिल तांदळे, कार्यक्रम अधिकारी सय्यद शफाकत, मनीषा शिंपी, अनुष्का वारे, नीलिमा बल्लाळ, अमर अग्रवाल आदी उपस्थित होते. प्रास्ताविक करताना कार्यक्रम अधिकारी सय्यद शफाकत यांनी जन शिक्षण संस्थेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी सुरू असलेल्या विविध उपक्रम व प्रकल्पांची माहिती दिली.

जन शिक्षण संस्थेचे नूतन संचालक अनिल तांदळे यांनी महिला आज विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत असल्याचे सांगितले. चिकाटी, जिद्द आणि कौशल्याच्या जोरावर महिला उद्योग व व्यवसाय क्षेत्रात स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण करीत आहेत. महिलांसाठी नोकरीपेक्षा उद्योग-व्यवसायाच्या माध्यमातून मोठ्या संधी निर्माण झाल्या असून, या संधींचा लाभ घेण्यासाठी महिलांनी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.


ADVOCATE
दैनिक आकर्षण वर्धापन दिन हार्दिक शुभेच्छा!
ॲड. सुरेश आबासाहेब लगड
बी.एस.सी. (ॲग्री)
एल.एल.बी.
विशेष सरकारी वकील
ऑफिस
अरविंद चेंबर्स, तांगे लेन,
अहिल्यानगर- ४१४००१
निवास
१३८, सातभाई मळा, दिल्लीगेट,
राजीव गांधी पतसंस्थेसमोर,
अहिल्यानगर,
मो. ८६६८३२४१८३


सुवर्णमय सेवेचे विश्वसनीय दालन
श्रीपाद ज्वेलर्स
श्रीपाद मधुकर शहाणे
मो. ८०८७००७७६५
देवदत्त मधुकर शहाणे
मो. ९८६०९८२५२५
महात्मा फुले रोड,
माळीवाडा, अहमदनगर
दु. (०२४१) २४१७७६५
दैनिक आकर्षण वर्धापन दिन हार्दिक शुभेच्छा


दैनिक आकर्षण वर्धापन दिन
हार्दिक शुभेच्छा!
श्री. योगीराज गाडे पा.
नगरसेवक, अहिल्यानगर महानगर पालिका


मा. ज्ञानेश्वर पुंड
दैनिक आकर्षण वर्धापन दिन हार्दिक शुभेच्छा!
-शुभेच्छुक-
मा. ज्ञानेश्वर पुंड
कट्टर शिवसैनिक


Hero
HONDA
SUZUKI
राजू शाह
मो. ९२७१५७५७०७
शाह
होंडा पॉईंट
सर्व प्रकारचे टु-व्हिलरचे
कामे खात्रीशीर केले जातील
कराचीवाला बेकरी समोर,
सर्जेपुरा, अहिल्यानगर
दैनिक आकर्षण वर्धापन दिन हार्दिक शुभेच्छा


दैनिक आकर्षण वर्धापन दिन
हार्दिक शुभेच्छा!
श्री. गिरीश भाऊ जाधव
उपजिल्हाप्रमुख, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)


दैनिक आकर्षण वर्धापन दिन
हार्दिक शुभेच्छा!
श्री. संतोषभाऊ गेनाप्पा
उपशहर प्रमुख, शिवसेना अहिल्यानगर
सौ. सुनिता संतोष गेनाप्पा
नगरसेविका, स्थायी समिती सदस्य, अहिल्यानगर महानगर पालिका


।। श्री चामुण्डाय नमः ।।
GS
घरसंसार शॉपी
An Exclusive showroom
of all gift articles &
Household products
Bangdiwala Height,
Sarda Lane, Ahmednagar
Mo : 9021449999
दैनिक आकर्षण वर्धापन दिन हार्दिक शुभेच्छा!


लक्ष्मी
होलसेल फटाका मार्ट
नेप्ती नाका, अहमदनगर
बोज्जा बदर्स
श्रीनिवास सुरेश बोज्जा
एम. कॉम., जी डी सी एन्ड ए.
दैनिक आकर्षण वर्धापन दिन हार्दिक शुभेच्छा
सौ. विणा श्रीनिवास बोज्जा
बी.ए. एन.सी.
मा. नगरसेविका , मनपा अहिल्यानगर
श्रीनिवास सुरेश बोज्जा
अध्यक्ष : पद्मशाली पंचकमिटी ज्ञाती समाज अहिल्यानगर
अध्यक्ष : विश्व निर्मल फौंडेशन शैक्षणिक संस्था
अध्यक्ष : सहजयोग चॅरिटेबल ट्रस्ट


दैनिक आकर्षण
वर्धापन दिन
हार्दिक शुभेच्छा
मा. श्री. संजय सानप
-शुभेच्छुक-
मा. संजय सानप मित्र मंडळ
अहिल्यानगर


दैनिक आकर्षण
समाजातील घडामोडींना
निर्भीडपणे वाचा फोडत...
सत्य आणि विश्वासार्ह
बातम्यांच्या माध्यमातून
वाचकांशी नाते जोडणाऱ्या...
दैनिक आकर्षण
वर्धापन दिनानिमित्त
मन:पूर्वक शुभेच्छा!
शिवसेना
सौ. रुपाली संदिपभाऊ दातरंगे
नगरसेविका, अहिल्यानगर महानगरपालिका
श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठान